# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२३

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ०९.०२.२०२३**

# पोलीस असल्याची बतावणी करून वयोवृध्दांना लुबाडणा-या दोघांना गुन्हे शाखा, कक्ष-०२, पनवेल कडुन अटक

(नवी मुंबई, मुंबई व ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील एकुण १३ गुन्हे उघडकीस आणून ५,३०,०००/- रूपये किंमतीचे सोन्याचे दागिणे जप्त)

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हदिद्मध्ये काही अज्ञात आरोपी हे वयोवृध्द् नागरीकांना अचानक रस्त्यात अडवून ''पुढे नाकाबंदी चालु आहे तुमचे दागिणे व्यवस्थीत ठेवा.'' तसेच '' तुम्ही मला ओळखले नाही का ? मी मोठा शेठ, दुकानदार आहे'' असे सांगुन बतावणी करून बोलण्यात गुंतवूण हातचलाखीने त्यांचे कडील सोन्याचे दागिणे फसवूण नेले बाबत अनेक गुन्हे दाखल आहेत.

नागरीकांसाठी सोन्याचे दागिणे हा भावनिक विषय असतो. आरोपी अशा प्रकारे सोन्याचे दागिणे बतावणी करून लुबाडुन नेणे अशा गंभीर गुन्हयांची तात्काळ उकल करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, मा. सह. पोलीस आयुक्त संजय मोहिते, मा. अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे) महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमित काळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) विनायक वस्त यांनी आदेशित केले होते.

अशा प्रकारचे गुन्हयांमध्ये आरोपी हे वयोवृध्द् नागरीकांना एकटे असताना हेरून करत असतात. वयोवृध्द् नागरींकांकडे आरोपींबाबत विचारपुस करताना खुप मर्यादा येतात. त्यामुळे सदरचे गुन्हे उघडकीस आणने पोलीसांना अतिशय आव्हानात्मक होते.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र वि. पाटील, गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने नवी मुंबई, ठाणे, मुंबई तसेच मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयामध्ये घडलेल्या गुन्हयांची माहिती प्राप्त केली. घडलेल्या गुन्हयांचे घटनास्थळी जावून फिर्यादी, साक्षीदार यांना भेटुन त्यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस करून आरोपींची संभाषणाची भाषा, बोलण्याची पध्द्त, पेहराव, शरीरयष्टी इत्यादीबाबत सखोल माहिती घेवून अशा प्रकारचे गुन्हे करणारी काही ठराविक आरोपींची टोळी सक्रिय झाली असल्याची खात्री केली.

गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे पथकाने गुन्हा घडल्याची वेळ, घटनास्थळी आरोपी येण्याजाण्याचा मार्गावरील सुमारे ६९ ठिकाणांचे सीसीटिव्ही. फुटेजची तपासणी केली. गुन्हयांचा तांत्रिक तपास करून गुन्हे शाखा कक्ष २, पनवेलचे पोउपनि. मानसिंग पाटील व पथकाने रबाळे

पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४७/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ या गुन्हयांमध्ये खालील दोन आरोपींना अटक केली.

**अटक आरोपींची नावे -**

***१) नरेश विजयकुमार जयस्वाल, वय ४२ वर्षे, सचिन म्हात्रे चाळ, शिळगाव, ता. कल्याण, जि. ठाणे,***
***२) बाबु इराप्पा मणचेकर, वय ६० वर्षे, रा. रूम नंबर ५०१, केदार बिल्डींग, सेक्टर २०, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड***

वरील दोन आरोपींना अटक करून आरोपींकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात ५,३०,०००/- रूपये किंमतीचे सोन्याचे दागिणे जप्त करून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| **अ.क्र.** | **पोलीस ठाणे** | **गु.र.नं. व कलम** |
|---|---|---|
| १ | वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई | ४०८/२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| २ | तुर्भे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ०९/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ३ | कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ५११/२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ४ | कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २५/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ५ | कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २७/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ६ | कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ५१/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ७ | नेरूळ पोलीस ठाणे, नवी मुंबई | ४४१/२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ८ | वाशी रेल्वे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २६/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३७९, ३४ |
| ९ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ४७/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| १० | माटुंगा पोलीस ठाणे, मुंबई | ७०८/२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ११ | सायन पोलीस ठाणे, मुंबई | ४९८/२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| १२ | महात्मा फुले पोलीस ठाणे, ठाणे शहर | ०९/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| १३ | कांजुरमार्ग पोलीस ठाणे, मुंबई | ०९/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ |

सदरची उल्लेखनिय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सपोनि संदिप गायकवाड, प्रविण फडतरे, पोलिस उप निरीक्षक वैभव रोंगे, मानसिंग पाटील, पो. हवा. प्रशांत काटकर, दिपक डोंगरे, रणजित पाटील, सचिन पवार, अनिल पाटील, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, अजित पाटील, जगदिश तांडेल, ज्ञानेश्वर वाघ, इद्रजित कानु, रूपेश पाटील, निलेश पाटील, राहुल पवार, सागर रसाळ, पो.ना. अजिनाथ फुंदे, प्रफुल मोरे, नंदकुमार ढगे, अभय मेऱ्या, पो.शि. संजय पाटील, विक्रांत माळी यांनी केली आहे.

---------------